# सेवक वार्ता

सप्टेंबर-२०२४

वर्ष -५ अंक- ११

**सेवानिवृत्त वनकर्मचारी संघ, महाराष्ट्र परिवाराचे विविध उपक्रम, विचारमंथन, घडामोडी, साहित्य याचे संवाद पत्र**

## 'मा. ग. गोगटे स्मरणार्थ व्याख्यान माला' वर्ष चौथे पुणे येथे यथोचित कार्यक्रम संपन्न

- वार्तांकन - श्री. एम. एम. कुलकर्णी

**पुणे**, २७ सप्टेंबर : सेवानिवृत्त वन कर्मचारी संघामार्फत सन २०२१ पासून ' स्वर्गीय श्री. मा. ग. गोगटे स्मरणार्थ व्याख्यान' या कार्यक्रमाचे आयोजन केले जात आहे. यावर्षी देखील दिनांक २७/सप्टेंबर २०२४ रोजी वनभवन, पुणे येथील सभागृहात हा कार्यक्रम झाला. विषय होता 'Gregarious Flowering of Bamboo-Management Concerns.. Chandrapur Story ' आणि वक्ते होते महाराष्ट्र राज्याचे सेवानिवृत्त प्रधान मुख्य वनसंरक्षक श्री मो ह खेडकर. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते सेवक संघाचे अध्यक्ष डॉ विश्वास सावरकर.

प्रास्ताविक श्री मदन कुलकर्णी, कार्यकारी अध्यक्ष, सेवक संघ यांनी केले. मान्यवरांचे स्वागत करुन श्री गोगटे साहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर सेवक संघाचे जे सदस्य व वन अधिकारी मागील वर्षभरात दिवंगत झाले त्यांच्याबाबत श्री पत्की साहेबांनी थोडक्यात माहिती सांगितली आणि या दिवंगत सदस्यांची नावे (२३ -२४) (१)विश्वास वाळके,(२) के ए. काटे, (३) डी एच दातार , (४) सी एम धारणकर, ( ५) डी पी देशमुख ६ एल जी कुलकर्णी,(७) डी जी कुंदोजवार, (८) एस एस शेवाळे, (९) उमेश दिघे व प अ, ठाणे, (१०) डी यू पाटील, धुळे, (११) के एम शिसोदे, धुळे, (१२) शांताराम महाजन, धुळे, (१३) एन जी जाधव, धुळे, (१४) श्रीपाद सरदेसाई, कोल्हापूर, (१५) व्ही व्ही डुबे, अमरावती, (१६) ए जे ओक सवसं, कोल्हापूर वन वृत्त, (१७) उमाळकर, FDCM Limited या दिवंगत वन अधिकाऱ्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

सेवक संघाचे सचिव श्री शिरीष अस्थाना यांनी कार्यक्रमासाठी लाभलेल्या वक्त्यांची ओळख करून दिली.

श्री. खेडकर साहेब,चंद्रपूर वन वृत्ताचे वन संरक्षक सन १९८२-८४ या कालावधीत म्हणून कार्यरत असताना तेथील हजारो हेक्टर वन क्षेत्रातील बांबूस फुलोरा आला होता. त्यावेळी अशा अत्यंत कामाचे आव्हानात्मक व्यवस्थापन कशाप्रकारे करण्यात आले याची सविस्तर माहिती श्री खेडकर साहेबांनी अतिशय रोचक रित्या कथन केली. त्यातील मुख्य मुद्दे खालीलप्रमाणे आहेत.

* त्यावेळी चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील सहा वनविभागाचे मिळून एकच चंद्रपूर वन वृत्त होते.

* मोठ्या क्षेत्रावर एकाच वेळी बांबूला फुलोरा आला तर परिस्थिती कशाप्रकारे हाताळायला हवी याचा अनुभव कोणत्याही वन अधिकार्याकडे नव्हता.
* त्यामुळे अनेक वर्षांपूर्वी फुलोरा कोठे आला होता याची माहिती मिळवण्यात आली. तेथील लोकांशी संवाद साधला. त्यातून काही माहिती मिळाली. त्यावेळी इंग्रजांची राजवट होती आणि आगीपासून वनसंरक्षण अतिशय निष्ठूरपणे केलं जात असे.
* राज्य शासनाच्या निदर्शनास या प्रकरणाचे गांभीर्य व त्या हाताळण्यात येणार्या अडचणी याची माहिती देण्यात आली. त्यांच्याकडून स्थानिक पातळीवर निर्णय घेण्याबाबत हिरवा कंदिल मिळवला.
* लाखो मेट्रीक टन बांबूचे निष्कासन करून त्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्यासाठी देशभरातील आठ पेपर मिलशी संपर्क साधून त्यांना वाळलेला बांबू शीघ्र गतीने वहातूक करण्याबाबत आवाहन करण्यात आले.
* मोठ्या क्षेत्रावर वाळलेला बांबू असल्याने आगीचा धोका विचारात घेऊन त्याचा विमा उतरविला गेला.
* वन विभागांचे अधिकारी, क्षेत्रीय कर्मचारी व पेपर मिलचे अधिकारी यांच्या बैठका घेऊन, सतत पाठपुरावा करुन कोणतीही दुर्घटना होऊ न देता बांबूचे निष्कासन करण्यात यश मिळवले.
* १२० मेट्रीक टन बांबू बी जमा करण्यात आले. त्यांचं वाटप इतर राज्यांच्या वनविभागांना करण्यात आले.
* काही बियाणे राज्यात साठविण्यात आले. अनेक मेट्रीक टन बांबू बी हवाई पेरणीसाठी वापरण्यात आले. त्यामुळे राजूरा सारख्या ठिकाणी जेथे जंगलात बांबू दिसणे बंद झाले होते, तेथे बांबू रोपे पुन्हा दिसू लागली.
* करप्रणाली निश्चित करणे व इतर काही बाबतीत मोठ्या प्रमाणात अडचणी येत गेल्या. तथापि राज्य शासन व वरिष्ठ अधिकारी यांचे सहकार्य मिळाल्याने त्यावर मात करता आली.

* वन अधिकारी व त्यांच्या अधिनस्त वन कर्मचाऱ्यांनी युध्द पातळीवर काम केल्याचे सांगून श्री खेडकर साहेबांनी त्यांना उचित श्रेय दिले.
* त्यांनंतर प्रश्नोत्तराच्या वेळेत काही उपस्थित अधिकाऱ्यांनी त्यांचे अनुभव कथन केले.
* डॉ सावरकर साहेबांनी अध्यक्षिय भाषणात स्पष्ट केले की अशा अतिशय गुंतागुंतीच्या व आव्हानात्मक परिस्थितीला तोंड देण्यासाठी अधिकाऱ्यांकडे leadership quality व व्यवस्थापकीय कौशल्य असणे अत्यंत आवश्यक असते. हे गुण श्री खेडकर साहेबांनी बांबू फुलोरा प्रकरणी तसेच त्यांच्या सेवा काळात अनेक वेळेला दाखवून दिले आहेत.
* सेवक संघाचे सहकार्यवाह श्री प्रदीप कुलकर्णी यांनी आभार प्रदर्शन केले.













## मध्य चांदा वन विभाग अल्ट्रा टेक सीमेंट लिमिटेड (माणिकगड यूनिट) गडचांदूर करिता वळती करावयाचे प्रकल्प बाधित वनक्षेत्राकरीता वन्यजीव शमन आणि संवर्धन आराखडा

उप वन संरक्षक, मध्य चांदा वनविभाग, चंद्रपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१२/ सर्व्हे / जमीन /२०२४-२५ चंद्रपूर दि. निरंक अन्वये मे. अल्ट्रा टेक सीमेंट लिमिटेड (माणिकगड यूनिट) गडचांदूर करिता वळती करावयाचे १९०.४२ हे. प्रकल्प बाधित वनक्षेत्राचे वन्यप्राणी उपशमन योजना / आराखडा तयार करून देण्याबाबत आलेल्या प्रस्तावास अनुसरून खालील प्रमाणे देकार मान्यतेस अमरावती शाखेने त्यांना सादर केला आहे.

१. सदर प्रकरणी प्रकल्प बाधित क्षेत्र निरीक्षण करण्यास किमान दोन दिवस अपेक्षित आहे. अनपेक्षित पाऊस आल्यास यात वाढ होवू शकेल.

२. याकरिता सेवक संघ दोन सदस्य चमू एकूण दिनांक ३१ जुलै २०२५ रोजी दुपारी चंद्रपूर येथे पोहचतील. सायंकाळी आपणासोबत सविस्तर चर्चा केल्यानंतर पुढील स्थळ निरीक्षनाचा कार्यक्रम ठरविण्यात येईल.

३. त्यापूर्वी आपणाकडून खालील नमूद माहिती उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे.

सदर प्रस्तावाची प्रत आणि त्याची KML फाइल व नकाशा

(1) (ii) सदर क्षेत्रातील वन्यप्राणी प्रगणना अहवाल (मागील ५ वर्षाचा)

(iii) सदर क्षेत्रातील मनुष्यप्राणी व पशुहानी संबंधित मागील ५ वर्षाचा गोषवारा GPS नोंदीसह

(iv) सदर क्षेत्रातील अस्तित्वात असलेले नैसर्गिक आणि कृत्रिम पाणवठे

(v) सदर क्षेत्र Eco-sensitive Zone मध्ये असल्याची माहिती

(vi) सदर क्षेत्रालगत असलेल्या गावांची यादी

(vii) विभागाचे कार्ययोजनेची प्रत

४. सदर आराखडा एकूण ५ प्रतीत ५ ऑगस्ट २०१४ पर्यंत वेईल.

५. याकरिता शुल्क रु. १ लाख अधिक १८% GST सह एकूण १,१८,००० अपेक्षित राहील.

**सेवकची वाटचाल .... नवी आव्हाने**

**वन विकास महामंडळाचे Plantation Inventory Unit कामाकरिता तयारी सुरू**

दिनांक 12 /9/2024 रोजी सेवक संघ अमरावती व नागपूर शाखा प्रतिनिधी यांनी श्री. संजीव गौड, व्यव. संचालक वन विकास महामंडळ पदी पदोन्नत झाल्याबद्दल भेट घेवून त्यांचे अभिनंदन केले.



त्यावेळी मा. गौड सरानी वन विकास महामंडळातील Plantation Inventory Unit कामाकरिता Teak plantation मधील Sample Plot मधील survived teak plants enumeration & height /girth measurements सह teak tree status च्या कामाबाबत विचारणा केली आहे. त्यास होकार देउन तयारी सुरू केली आहे. याकरिता श्री. संजय जगताप यांनी मा. पत्की सरांचे सूचनेनुसार PIU FDCM हा व्हॉटस्अप ग्रुप तयार केला आहे. त्यात सेवक सदस्याना सामावून घेतले आहे.

**सोलापूर-उस्मानाबाद रेल्वे मार्गासाठी वन्यजीव शमन आणि संवर्धन आराखडा**

दि. १९-९-२०२४ रोजी पुणे येथे सोलापूर-उस्मानाबाद रेल्वे प्रकल्पासाठी वन्यजीव शमन आणि संवर्धन आराखड्यावर बैठक झाली. बैठकीला रेल्वे, सेवक संघ, वन्यजीव व दोन प्रादेशिक वन विभाग, वन अकादमी प्रतिनिधी, असे एकूण १२ जण उपस्थित होते.

श्री. पत्की यांनी बैठकीचे संचालन केले. रेल्वे प्राधिकरणाने नवीन लाईन मार्ग आखणीची सविस्तर माहिती दिली. वनस्पती तज्ज्ञ डॉ.संतीश यादव यांनी वर्गीकरण सर्वेक्षणासाठी करावयाच्या कामाची माहिती दिली. बैठकीत हे निदर्शनास आणून दिले की ESZ संदर्भात, रेल्वे प्राधिकरणाने स्वतंत्रपणे वन्यजीव मंजुरीचे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. डॉ.संतीश यादव वनस्पती सर्वेक्षणाचे काम ४ ऑक्टोबर रोजी सुरू करणार असून ४५ दिवसांत ते पूर्ण होणार आहे. तसेच स्थानिक मानद वन्यजीव रक्षक व वन अधिकारी व स्थानिक लोकांच्या मदतीने वन्यजीव सर्वेक्षण सुरू केले जाईल. त्यांची बैठक घेऊन त्यांच्या बैठकीत दिवस आणि तारीख निश्चित केली जाईल. हे काम निर्धारित वेळेत म्हणजे ९० दिवस किंवा त्याही आधी पूर्ण होईल, असा विश्वास सेवक संघाकडून व्यक्त करण्यात आला. आढावा घेण्यासाठी आणि प्रगती अहवाल सादर करण्यासाठी आवश्यक बैठका बोलावल्या जातील. शमन आणि संवर्धन आराखडा तयार करताना सर्वतोपरी काळजी घेतली जाईल जेणेकरुन कोणतेही प्रश्न उद्भवणार नाहीत. असेही सेवक संघाकडून व्यक्त केले.

चंद्रपूर वन प्रबोधिनी व सेवक संघात २३ सप्टेंबरच्या झालेल्या समझोत्याप्रमाणे नवीन सोलापूर-उस्मानाबाद रेल्वे मार्गासाठी वन्यजीव शमन आणि संवर्धन आराखडा तयार करण्याचे काम स्वीकारण्याची तयारी दर्शवली

सोलापूर-उस्मानाबाद सुमारे ९० किमी लांबीच्या रेषीय नवीन रेल्वे मार्गासाठी वन्यजीव शमन आणि संवर्धन योजना तयार करण्याचे काम खालील महत्त्वाच्या अटींवर स्विकृत केले आहे.

(२) खर्च: रु.९.४४ लाख. (२) पेमेंट : ४ समान हप्त्यांमध्ये देय खर्चावर १८ टक्के GST सह (३) कामाचा कालावधी: ९० दिवस. आम्ही ताबडतोब काम सुरू करू आणि ९० दिवसांच्या निर्धारित कालावधीत काम पूर्ण करण्याचा प्रयत्न राहीन.

या कामासाठी सेवकचे खालील सदस्यांची टीम स्थापन करण्याचे ठरविले आहे.

१. व्ही. बी.सावरकर- चमू प्रमुख

२. अजय पिलारीसेट- चमू उप प्रमुख

३. सुभाष बडवे - सदस्य

४. एस. व्ही. कुंभकर्ण- सदस्य

५. डॉ. संतोष यादव - वर्गीकरण शास्त्रज्ञ.

६. पी. बी. धानके- सह- वर्गीकरण शास्त्रज्ञ.

७. व्ही. टी. पत्की - समन्वयक.

श्री. पत्की चमू प्रमुखांशी सल्लामसलत करून खर्चाचा अंदाज तयार करतील आणि त्यांच्या मंजुरीबद्दल माहिती देतील.

## नवी आव्हाने

**अभ्यासक्रम सुधारीत करून वाचन साहित्य निर्माण करणेचे काम... प्रगतीचा आढावा**

वनरक्षकाचे पायाभूत प्रशिक्षणाकरीता वाचन साहित्यात /अभ्यासक्रमातील सर्व बाबी समाविष्ट आहेत किंवा नाही/ तपासणी करणा-या समिति सदस्य व लेखक यांनी करून वाचन साहित्य अंतिम करण्याची कारवाई आता अखेर पूर्ण केली आहे.

पुस्तक परिचय....

## ताडोबातील पारंपारिक वनौषधी

**डॉ. शेषराव हिं. पाटील**

**प्रधान मुख्य वनसंरक्षक (सेवानिवृत्त)**

ताडोबातील वने ही मिश्र पानगळीची वने या प्रकारातील आहेत. वन्यजिवांनी समृद्ध असलेल्या या क्षेत्रात १९०५ मध्ये ताडोबा सरोवराभोवती प्रवेशावर निर्बंध घालण्यात आले. त्यानंतर १९३५ मध्ये हे क्षेत्र अभयारण्य म्हणून घोषित करण्यात आले व १९५५ मध्ये तत्कालीन मध्य प्रदेश शासनाने ताडोबा व कान्हा ही क्षेत्रे राष्ट्रीय उद्याने म्हणून घोषित केली. ताडोबा राष्ट्रीय उद्यानाचे क्षेत्र ११६.५ चौ. कि.मी. एवढे होते. पुढे १९८६ मध्ये ५०८.८५ चौ.कि.मी. अंधारी अभयारण्य घोषित झाले व २००५ मध्ये या दोन्ही क्षेत्रांचा मिळून ६२५.३५ चौ.कि.मी. क्षेत्रावर ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प हा राज्यातील दुसरा व्याघ्र प्रकल्प घोषित झाला.

या व्याघ्र प्रकल्पात वाघ, बिबट, रानकुत्रे, अस्वल, गवे, चितळ, सांभर, रानडुकरे, निलगाय इ. प्राणी मोर, सर्प गरुड, खंड्या, करकोचे, घुबड इ. पक्षी कासव, साप, मगर इ. सरपटणारे प्राणीही आढळतात. येथे मगर प्रजनन केंद्र देखील उभारण्यात आले होते.

या सोबतच येथील समृद्ध वनात साग, शिसम, ऐन, आवळा, हिरडा, बेहडा, जांभुळ, बेल, कड, धावडा, अर्जुन, बिजा, भेरा, ऐन, आपटा, अमलतास, आंबा, चिंच, कवठ, टेंभरुण, चारोळी, पळस अशी अनेकविध झाडे व वनस्पतीही आढळतात.

श्री. एस. के. मल्होत्रा व श्री. एस मुर्ती या भारतीय वनस्पती सर्व्हेक्षण संस्थेच्या शास्त्रज्ञांनी केलेल्या सव्र्व्हेक्षणाचा अहवाल "फ्लोरा ऑफ ताडोबा नॅशनल पार्क' १९९२ मध्ये प्रकाशित झाला. यात ताडोबा व परिसरातील वनस्पतींचे सर्व्हेक्षणात आढळलेल्या प्रजातीचा समावेश करण्यात आलेला आहे. या सव्र्व्हेक्षणात त्याना ११० कुटूंबातील ३९३ कुळे व ६६७ प्रजाती आढळून आल्या आहेत. अर्थातच या समृद्ध वनक्षेत्रात औषधी वनस्पती देखील विपुल प्रमाणात आढळतात.ताडोबातील पंचक्रोशीतील वैद्यांकडून घेतलेल्या माहितीचे आधारे हे पुस्तक तयार करण्यात आले आहे.

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात पाच वर्षावर (२००४-२००९) क्षेत्र संचालक म्हणून काम बनीत असतांना स्थानिक लोक करीत असलेले पारंपारिक औषधोपचार याचीही माहिती होत गेली. लाडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील व सभोवतालचे गावांमधील वैद्याची (वैदू) कचितरी भेट होत असे व ते करीत असलेल्या जडीबुटीची / वनस्पतींची माहिती मिळत असे. त्यांच्या नोंदी मी ठेवत असे. एकदा पंचक्रोशीतील वैदुचे एक सम्मेलनही ताडोबा येथे आयोजित केले होते. सेवेतील व्यस्तता व धकाधकित केव्हातरी ते प्रसिध्द करू असे तरवले. मात्र ते होण्यासाठी १३ वर्षाचा कालावधी लोटला.


खरं तर सर्वच वनस्पतीमध्ये काही ना काही औषधी गुण असतात. अष्टांगहृदयमधील सूत्रस्थानाचे ९ व्या प्रकरणातील १० व्या श्लोकात औषधीबद्दल माहिती दिली आहे."... जगत्येवमनौषधम् न किंचीतविद्यते द्रव्यम् वषानार्थ योगयोः" याचा अर्थ या सृष्टीत अशी कोणतीही वस्तू नाही जी कोणत्याही प्रकारे औषध म्हणून उपयोगात येणार नाही. तथापी नेहमीच्या औषधी उपयोगातील वनस्पतींना आपण औषधी वनस्पती म्हणतो.

स्थानिक औषधी परपंरा पुनर्जीवित करणाऱ्या (**Foundation for Revitalization of Local health Traditions FRLHT**) या संस्थेच्या अहवालाप्रमाणे आपल्या देशात आयुर्वेद, सिध्द, युनानी अशा औषधोपचार पध्दतीमध्ये सुमारे ८००० इतक्या वनस्पतींचा वापर होतो. मात्र त्यातील अर्ध्या अधिक वनस्पतींचा उपयोग पारंपरिक औषधोपचार पद्धतीमध्येच होतो. म्हणूनच पारंपरिक औषधी उपयोगांची माहिती करून घेऊन त्यांची अशी नोंद करणे अगत्याचे ठरते.

हे पुस्तक आपल्या हाती देतांना आनंद होत आहे. यामध्ये १०८ सर्वसाधारण वनस्पतींचा समावेश करण्यात आला आहे. राष्ट्रीय उद्याने / अभयारण्ये अशी सुरक्षित क्षेत्रे वन्यप्राण्यांसोबतच हा सर्व वनस्पतींचा व जैवविविधतेचा ठेवाही सुरक्षित ठेवण्याचे काम करतात ही समाधानाची बाब आहे. यातील वनस्पतींची सर्व वनकर्मचाऱ्यांना व वनस्पतींचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना व जनसामान्यांना ओळख होईल अशी अपेक्षा आहे.

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प प्रशासन व विशेषतः डॉ. जितेंद्र रामगावकर यांनी या पुस्तकासाठी केलेल्या मदतीबाबत त्यांचे हार्दिक आभार! श्री. शशिकांत दळवी यांनी केलेल्या मराठी, इंग्रजी टंकलेखनाबाबत त्यांचे हार्दिक आभार!

हे पुस्तक मी ताडोबाच्या पंचक्रोशीतील सर्व वैदु बांधव व ताडोबाच्या संवर्धनासाठी झटणाऱ्या सर्व क्षेत्रिय कर्मचाऱ्यांना समर्पित करीत आहे.





किशोर दत्तात्रय गुजर, सेवानिवृत्त वनपाल, वय- ६० वर्षे , रा. प्लॉट न २३ अ,शारदा नगर,शिरपूर यांचे दि.- १६-९-२०२४ रोजी पहाटे ३.३० वा. रोजी धक्कादायक आणि अनपेक्षित दुःखद निधन झाले. त्यांच्या उदात्त आत्म्यास सद्गती मिळो, ही प्रार्थना. सेवक संघ परिवारातर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.



अ. ज. ओक यांचे सेवानिवृत्त स. व..यांचे दि.- १८-९-२०२४ रोजी गुहागर येथे हृदय विकाराने निधन झाले. त्यांनी भोर उपविभाग, सावंतवाडी, चिपळूण, सातारा विभागात काम केले होते. ते अत्यंत धाडसी व उत्तम मार्गदर्शक होते. ईश्वर मृतात्म्यास चिरशांती देवो. सेवक संघ परिवारातर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

••◈•• ••◈••

## पेंशनर्स डे (निवृत्तीधारकदिन),

सर्व निवृत्ती वेतनधारकांना
खूप खूप शुभेच्छा
आरोग्यासह शतायुषी व्हावे
हीच आमची सदिच्छा ||१||
अठ्ठावन-साठ हे काय
निवृत्तीचं वय असतं
तेव्हाच तर आपलं खरं
दुसरं बालपण सुरू होतं ||२||
मोकळा वेळ भरपूर असतो
अंगात उसनं बळ असतं
उत्साह ओसंडून वहात असतो
अन् कुठलंही बंधन नसतं ||३||
जबाबदाऱ्या संपलेल्या असतात
आर्थिक ताण उरलेला नसतो
वरिष्ठांचे बॉसिंग नसते
धावपळसुध्दा संपलेली असते ||४||
आपल्या मनाचे आपण राजे
सगळं काही आपण ठरवणार
केव्हा उठायचं केव्हा झोपायचं
हे निर्णय आपलेच असणार ||५||

बायको नुसती राबत होती
तिला द्यायला वेळच नव्हता
आता तिला सारं द्यायचय
निर्णय माझा झाला आता ||६||

मुलांचं विश्व वेगळं झालं
त्यांचे संसार थाटले गेले
आमच्यासाठी वेळ नाही
त्यांच्या संसारात ते रमले ||७||
तब्येत चांगली आहे तोवर
इच्छा साऱ्या पूर्ण करू
आनंदाचे क्षणन् क्षण
गोळा करून बेगमी करू ||८||
अजून खूप खूप जगायचं आहे
जमलं नाही ते करायचं आहे
आप्त, मित्रांसवे दंगामस्तीत
पुन्हा थोडं रमायचं आहे ||९||
नव्याने सुरूवात करू
जुनं सारं फेकून देऊ
पुन्हा उभारी घेऊन आता
राहिलेले जगून घेऊ ||१०||

सर्व निवृत्तीधारकांना हार्दिक शुभेच्छा

••◈•• ••◈••

देव हा माणसाच्या मनात जेवढा असतो...
त्यापेक्षा जास्त माणसाच्या कर्मात असतो...
आणि आपल्या चांगल्या कर्मातला देव
कोणाला दाखवण्याची गरज नसते...
तो सर्वांना दिसत असतो...
म्हणुन
पण कर्मातला देव कधीही टाळु नका.

केवळ खाजगी वितरणासाठी
प्रकाशक - सेवक संघ, महाराष्ट्र, पुणे
संपादन - एस. के. गवळी
कार्यालय - वन ग्रंथालय, दुसरा मजला, वनभवन, भांबुर्डा वन विहार, गोखले नगर, पुणे - १६